महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २४२ वे | दिनांक : २९/०८/२०२६ | वार : शनिवार

## न्यायालयात टिकेल असे हक्काचे आरक्षण मराठा समाजाला मिळेल - आमदार शिवेंद्रराजे भोसले



**मुंबई :** मराठा समाजाला न्यायालयात टिकेल असे हक्काचे आरक्षण नक्की मिळेल, असा ठाम विश्वास भाजपचे आमदार शिवेंद्रराजे भोसले यांनी व्यक्त केला आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यात सध्या मोठे सामाजिक वातावरण तापलेले असताना, शिवेंद्रराजे यांनी राज्य सरकारच्या भूमिकेचे समर्थन करत मराठा समाजाला आश्वस्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीवर बोलताना शिवेंद्रराजे भोसले यांनी स्पष्ट केले की, "न्यायालयात टिकेल असे हक्काचे आरक्षण मराठा समाजाला मिळेल. हे आरक्षण देताना राज्यातील इतर कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही, याची पूर्ण काळजी राज्य सरकार घेणार आहे." आरक्षणाचा गुंता सोडवताना सर्वसमावेशक तोडगा काढला जाईल, असे संकेत त्यांनी यातून दिले आहेत. तसेच, याआधीही सरकारने मराठा आरक्षणाचा मुद्दा अत्यंत सकारात्मकतेनेच हाताळला असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिलेला अल्टिमेटम उद्या संपत आहे. उद्यापासून मनोज जरांगे पाटील हे अंतरवाली सराटीमध्ये आपले निर्णायक उपोषण सुरू करत आहेत. जरांगे पाटील यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेत मराठा बांधवांना मोठ्या संख्येने अंतरवालीत येण्याचे आवाहन केले आहे.

मनोज जरांगे हे मुख्यमंत्र्यांवर काही बोलतील असे मला वाटत नाही. कारण गेल्या ३ महिन्यांत मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून जितके जीआर काढायचे होते, तेवढे काढण्यात आले आहेत. काही विभागांत हे जीआर पोहोचलेले नाहीत किंवा ग्रामीण पातळीवर तफावत राहिली आहे, हे आम्ही मान्य करतो. परंतु, समाजात तेढ निर्माण करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्र्यांनी राधाकृष्ण विखे पाटील यांना दिले आहेत, अशी माहिती भाजप आमदार प्रसाद लाड यांनी दिली.

आमदार प्रसाद लाड म्हणाले, सध्या सणासुदीचे दिवस असून मुंबईत गणेशोत्सव आणि दहीहंडी मोठ्या प्रमाणावर साजरी केली जाते. त्यामुळे मनोज जरांगे यांनी मुंबईत येऊ नये, असे आमचे आवाहन होते. आमच्या विनंतीचा मान ठेवत त्यांनी मुंबईत न येण्याचा निर्णय जाहीर केला आहे. जरांगे पाटील यांच्या ज्या काही मागण्या आहेत, त्या मुख्यमंत्री १०० टक्के पूर्ण करतील. तर सदावर्ते माझे मित्र आहेत, ते असे का करत आहेत याची कल्पना नाही, पण मी त्यांच्याशी नक्की बोलेन.

## नाशिकचे रस्ते टकाटक; मुख्यमंत्र्यांनी महिन्यातून एकदा यावे - भुजबळांचा मिश्किल टोला



**नाशिक :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक उप-परिसर प्रशासकीय इमारतीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकतेच उद्घाटन करण्यात आले, ज्याला मंत्री गिरीश महाजन हेदेखील उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना मंत्री छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्र्यांना मिश्किल टोला लगावत म्हटले की, नाशिकचे रस्ते आज टकाटक झाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिन्यातून एकदा नाशिकला यायला पाहिजे. आमच्या व्यथा जाणून घेण्यासाठी मुख्यमंत्री मोटारीने नाशिकपर्यंत आले त्यांचे खूप खूप आभार. जागोजागी पोलिस पण थांबवले आहेत. अजिबात ट्रॅफिक देखील जाम होऊ देत नाहीत. इगतपुरीपासून नाशिकला येईपर्यंत हाडे खिळखिळा होतात, असा टोला भुजबळ यांनी लगावला.

छगन भुजबळ म्हणाले, नाशिकसाठी आजचा दिवस खूप महत्वाचा आणि आनंदाचा आहे. ही इमारत इतर जिल्ह्यात जाणार होती. मात्र आम्ही मीटिंगमध्ये नाशिक निवडले. स्थानिक नागरिक आणि शेतकरी यांनी कोणतीही अडचण आणली नाही, त्यांचे आभार. प्रत्येक वेळी पुणे येथे जाणे शक्य नव्हते, म्हणून नाशिकला हे उपकेंद्र खूप आवश्यक होते. तसेच कोणाचे नाव घुसण्याचे प्रयत्न नको, ज्याचे नाव घेत आहे तेही खूप मोठी माणसं आहेत, असे भुजबळ यांनी म्हटले.

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, मी मुख्यमंत्री महोदय यांची परवानगी घेऊन बोलायला उभा राहिलो आहे. पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्यासाठी खूप कष्ट होते. नाशिकचे रस्ते आज टकाटक झाले आहेत. महिन्यातून तुम्ही एकदा तरी इकडे यायला पाहिजे, असा टोला भुजबळ यांनी देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून बोलताना लगावला.

दरम्यान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक उप-परिसर प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले. याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्र्यांनी, हे नाशिकच्या शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने टाकलेले एक अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे मत व्यक्त केले.

## विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून राहुल गांधींचा 'रिलाँच' करण्याचा काँग्रेसचा डाव — बावनकुळे



**मुंबई :** महाराष्ट्रात शासकीय वसतिगृहांच्या प्रवेशातील वयाची अट रद्द करणे, रिक्त पदांची भरती आणि इतर मूलभूत मागण्यांसाठी आदिवासी विद्यार्थ्यांचे पुणे (मांजरी), नाशिक व नागपूर येथे आंदोलन आणि आमरण उपोषण सुरू असून, यावरून विरोधकांनी भाजप सरकारला लक्ष्य केले आहे. यावर प्रतिक्रिया देताना मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसवर जोरदार पलटवार करत म्हटले आहे की, आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर राजकारण करुन राहुल गांधींचे महाराष्ट्रातील 'रिलाँचिंग' करण्याचा प्रयत्न काँग्रेसने थांबवावा. सरकार विद्यार्थ्यांशी तीनदा चर्चा करु शकते, गरज पडल्यास चौथ्यांदा नव्हे तर हजारदा संवाद साधण्याचीही तयारी ठेवत आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सरकारने विद्यार्थ्यांशी चर्चा केली आहे. त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेत लिखित आश्वासनही दिले आहे. सरकार विद्यार्थ्यांशी तीनदा चर्चा करू शकते, गरज पडल्यास चौथ्यांदा नव्हे तर हजार वेळा संवाद साधण्याचीही तयारी ठेवते. मग प्रश्न सुटण्याच्या मार्गावर असतानाही आंदोलन सुरू ठेवण्याचा हट्ट का? असा सवाल बावनकुळे यांनी उपस्थित केला आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून राहुल गांधींच्या पुढील महाराष्ट्र दौऱ्यापर्यंत आंदोलन पेटते ठेवण्याचा काँग्रेसचा डाव हा आदिवासी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळण्याचा प्रकार असल्याची टीकाही बावनकुळे यांनी केली आहे.

पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सुविधा आणि शैक्षणिक संधी वाढविण्यासाठी शासन संवेदनशीलपणे काम करत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य घडविणे हा सरकारचा उद्देश आहे. मात्र काँग्रेसला विद्यार्थ्यांच्या करिअरपेक्षा आपल्या नेत्यांचे राजकीय करिअर वाचवण्याची अधिक चिंता असल्याचे या आंदोलनाच्या निमित्ताने स्पष्ट होत आहे, असा टोलाही बावनकुळे यांनी लगावला.

आदिवासी समाजाच्या प्रश्नांशी खरोखरच काँग्रेसला आस्था असेल, तर त्यांनी विद्यार्थ्यांना राजकीय आंदोलनाचे साधन बनविण्याऐवजी सरकारसोबत संवाद साधावा. आदिवासी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळू नका आणि आपल्या राजकीय स्वार्थासाठी त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवू नका, अशी टीका चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २९ ऑगस्ट २०२६


## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक इटोली शाळेत रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात साजरा



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** दि. २८ ऑगस्ट २०२६ वार शुक्रवार रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा इटोली येथे *रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधत शाळेतील सर्व विद्यार्थीनींनी आपल्या भावाच्या हाताला राखी बांधून औक्षण करत आशीर्वाद मागितला. भावांनी सुद्धा आपल्या बहिणीला अनमोल भेट देत हाताला राखी बांधून घेतली. हा कार्यक्रम अतिउत्साहामध्ये साजरा करत आनंद व्यक्त केला.

या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय भास्कर जुमडे साहेब व सर्व शिक्षक वृंद, विद्यार्थीगण उपस्थित होते या कार्यक्रमासाठी सर्वांनी परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वी केला.

## तेरणा हायस्कूलमध्ये रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर :** तेरणा हायस्कूल, येथे रक्षाबंधन सण मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. शाळेच्या प्रांगणात विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना राखी बांधून औक्षण केले व भाऊ-बहिणीच्या अतूट नात्याला उजाळा दिला.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक श्री. के.पी. पवार यांनी भूषवले. त्यांनी आपल्या भाषणात रक्षाबंधन हा केवळ सण नसून तो बहिणीच्या रक्षणाची जबाबदारी आणि सन्मानाची भावना असल्याचे सांगितले. यावेळी व्यासपीठावर मान्यवर म्हणून केशवराव मुंडे, रमेश प्रधान, रमेश जोशी, भाग्यश्री काळे,उषा उदगे, सिंधू बोर्डे यांची उपस्थित होती.विद्यार्थिनींनी स्वहस्ते तयार केलेल्या आकर्षक राख्यांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी "बहिणीचे रक्षण हेच खरे कर्तव्य" अशी प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदिप भाले तर आभार प्रदर्शन रमेश जोशी यांनी केले.






## श्री विठ्ठलसाईचे रोलर पुजन आमदार बसवराज पाटील यांच्या हस्ते संपन्न



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री विठ्ठलसाई स.सा.का.लि, मुरुम कारखान्याच्या गळीत हंगाम २०२६-२७साठीचे रोलरचे पुजन माजी मंत्री तथा कारखान्याचे चेअरमन मा.आ.श्री.बसवराजजी पाटील साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना श्री पाटील साहेब म्हणाले की, सध्या कारखाना कार्यक्षेत्रात साधारणत: १८,००० हेक्टर क्षेत्राची ऊसाची लागवड झाली आहे. अपूरा पर्जन्यमान असला तरी कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात ऊसाची उपलब्धता आहे. हंगाम २०२६-२७ मध्ये कारखाना कार्यक्षेत्रातील संपूर्ण ऊसाचे वेळेवर गाळप केले जाईल. तसेच सक्षम ऊस तोडणी वाहतूक यंत्रणा भरणा करण्यात आली आहे. कारखाना मशिनरी दुरुस्तीची कामे पुर्ण करण्यात येत असून ऊस उत्पादक व सभासदांनी जास्तीत जास्त ऊस देवून सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी मुरुम नगरपरिषद चे नगराध्यक्ष तथा जिल्हा बँकेचे अध्यक्ष मा.श्री. बापुरावजी पाटील साहेब, उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन मा.श्री. शरणजी पाटील साहेब कारखान्याचे संचालक सर्वश्री. शरणप्पा पत्रिके, केशवराव पवार, शिवलिंग माळी, व रविंद्र चव्हाण, गणेश अंबर, नागनाथ पत्रिके, अॅड. विश्वनाथ पत्रिके, सुजित शेळके, बबन बनसोडे, सतिश पवार, संजीव पाटील, शाहुराज डोके, प्रकाश आष्टे, सचिन पाटील, नितीन रेड्डी चाकुर जिल्हा सरचिटणीस नगरसेवक, उमाकांतप्पा शेटे, शहर चिटणीस आदीसह कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री. एस.आर. गवसाणे, कारखान्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी व कामगार, ऊस उत्पादक शेतकरी, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## राखी पौर्णिमा

बहीण भावाच्या
अतूट नात्याचा
सण आला हा
राखी पौर्णिमेचा

रेशमी धागा
सौख्याचा नि स्नेहाचा
बहीण भावाच्या
अतूट प्रेमाचा

सुख दु:खात भाऊ
सदैव असतो पाठी
नात्यांची महती सांगते
हातावरील रेशीमगाठी

रूसवे फुगवे आता
सोडून द्यावे
बंध मायेचे
निरंतर रहावे

जिवापाड भाऊ जपतो
राखी लाख मोलाची
सण हा सांगतो
महती हळव्या प्रेमाची




- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २९ ऑगस्ट २०२६


# उत्कृष्ट पत्रकार म्हणून मंचक जगताप यांचा सन्मान



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** दै. 'सामना'च्या वर्धापन दिनानिमित्त नांदेड येथे आयोजित करण्यात आलेल्या विभागीय बैठकीत परभणी जिल्ह्यातून उत्कृष्ट पत्रकारिता, जाहिरात व्यवसाय व प्रभावी वार्तांकन केल्याबद्दल जिंतूरचे तालुका प्रतिनिधी मंचक जगताप देशमुख यांचा प्रथम क्रमांकाने सन्मान करण्यात आला.दैनिक 'सामना'च्या वर्धापन दिनानिमित्त 27 सप्टेंबरच्या पार्श्वभूमीवर बुधवार, 26 ऑगस्ट रोजी नांदेड येथील शासकीय विश्रामगृहात सामना टीमच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस नांदेड, परभणी, लातूर व हिंगोली जिल्ह्यांतील जिल्हा प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी आणि वार्ताहर उपस्थित होते.यावेळी निवासी संपादक गणेशजी तुळशी, महाव्यवस्थापक नितीनजी मोरे यांच्यासह वरिष्ठ मान्यवरांच्या उपस्थितीत मंचक जगताप यांना जेष्ठ पत्रकार नारायण पाटील यांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.यावेळी परभणी जिल्हा प्रतिनिधी सुरेश जंपनगिरे, नांदेड जिल्हा प्रतिनिधी विजय जोशी, हिंगोली जिल्हा प्रतिनिधी सचिन कवडे, लातूर जिल्हा प्रतिनिधी अभय मिरजकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व मित्र परिवाराच्या वतीने व्हाईस ऑफ मीडिया विजय चोरडिया प्रदेशाध्यक्ष, भागवत चव्हाण जिल्हा संघटक, सचिन रायपत्रीवार अध्यक्ष, सचिव दिलीप देवकर, उपाध्यक्ष संदीप माहूरकर, मार्गदर्शक गुलाबराव शिंदे, चंद्रकांत गवळी, राम रेघाटे, अशोक लोखंडे, पांडुरंग निळे माजी उपप्राचार्य आधीच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

# "संघटनेची ताकद"

जगभरातील तरुणासाठी हा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे - "संघटनेची ताकद ही केवळ सभासदांच्या संख्येवर अवलंबून नसून, ती सभासदांच्या प्रामाणिकपणावर, संघटनेच्या एकनिष्ठतेवर आणि शिस्तपालनावर अवलंबून असते."असे माझे वैयक्तिक मत आहे.आज अनेकांना वाटते की गर्दी म्हणजे ताकद. ज्या संघटनेत जास्त लोक, ती संघटना मोठी आणि शक्तिशाली. पण इतिहास वेगळेच सांगतो. संख्या ही केवळ आकडा आहे, खरी शक्ती ही गुणवत्तेत असते.एखाद्या संघटनेत लाखो सभासद असतील, पण जर ते स्वार्थी असतील, एकमेकांवर विश्वास नसेल, आणि वेळ आल्यावर पाठ फिरवणारे असतील, तर ती संघटना कागदी वाघासारखी ठरते. उलट, मूठभर पण प्रामाणिक, एकनिष्ठ आणि शिस्तबद्ध कार्यकर्ते असतील तर ते कोणतेही ध्येय साध्य करू शकतात.याचे उत्तम उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे. मावळे संख्येने मुघल सैन्यापेक्षा खूप कमी होते, पण त्यांची स्वराज्यावरची निष्ठा, महाराजांवरचा विश्वास आणि शिस्त यामुळे त्यांनी मोठ्या साम्राज्याला हादरवून सोडले.प्रामाणिकपणा हा संघटनेचा आत्मा आहे. जेव्हा सभासद संघटनेशी आणि ध्येयाशी प्रामाणिक असतो, तेव्हा भ्रष्टाचार आणि गटबाजी होत नाही. एकनिष्ठता संघटनेला एका धाग्यात बांधून ठेवते. मतभेद असले तरी ध्येयापासून विचलित न होणे हीच खरी निष्ठा. आणि तिसरा सर्वात महत्त्वाचा खांब म्हणजे शिस्त. शिस्त नसेल तर संघटना ही जमाव बनते. शिस्तच गर्दीचे संघटनेत रूपांतर करते.म्हणूनच कोणतीही संघटना - ती राजकीय पक्ष असो, कंपनी असो, किंवा सामाजिक चळवळ असो - तिला मोठे व्हायचे असेल तर सभासदांची संख्या वाढवण्यापेक्षा त्यांच्यात प्रामाणिकपणा, एकनिष्ठता आणि शिस्त रुजवण्यावर भर दिला पाहिजे. कारण शंभर निष्ठावंत शेर हे हजार लांडग्यांपेक्षा जास्त शक्तिशाली असतात.



**~प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे. जालना.**




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २९ ऑगस्ट २०२६


## सम्यक पब्लिक स्कूलमध्ये रक्षाबंधन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** रेणुका नगर, गारखेडा परिसर येथील सम्यक पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांमध्ये रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.यावेळी विद्यार्थ्यांनी एकमेकांना राखी बांधून भाऊ-बहिणीच्या प्रेम, आपुलकी, जिव्हाळा आणि संरक्षणाची भावना जोपासण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रक्षाबंधन सणाचे महत्त्व तसेच भारतीय संस्कृतीतील सण-परंपरांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला या कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका उज्वला साळवे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी रुचिता खांडेकर, स्वर्ण नेमाडे, अंजली लोलेवार, साक्षी सोनवणे, शितल भोरे, प्रज्ञा मोरे, नेहा काटकर, रणमाले विजयश्री, अयोध्या ढाकणे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## बहिरगाव शाळेत झाडांना राखी बांधून विद्यार्थ्यांनी साजरे केले 'वृक्ष रक्षाबंधन'



**कन्नड :** रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्रशाला बहिरगाव, ता. कन्नड येथे इको क्लब व राष्ट्रीय हरित सेना यांच्या संयुक्त विद्यमाने अनोख्या पद्धतीने 'वृक्ष रक्षाबंधन' उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी व विद्यार्थिनींनी प्रशालेच्या परिसरातील झाडांना राख्या बांधून 'वृक्ष माझा भाऊ' असा भावनिक संदेश देत वृक्षसंवर्धनाची शपथ घेतली.रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा सण आहे. याच भावनेला पर्यावरण संवर्धनाची जोड देत विद्यार्थ्यांनी झाडांनाही आपला भाऊ मानून त्यांच्या खोडाला राखी बांधली. झाडांचे संरक्षण, संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प यावेळी विद्यार्थ्यांनी केला.प्रशालेच्या परिसरात सुमारे 150 झाडे असून या झाडांची नियमित काळजी विद्यार्थी घेत असतात. झाडांना पाणी देणे, परिसर स्वच्छ ठेवणे, झाडांचे संरक्षण करणे अशा विविध माध्यमातून विद्यार्थी सातत्याने वृक्षसंवर्धनाचे कार्य करतात. रक्षाबंधनाच्या निमित्ताने झाडांना राखी बांधून विद्यार्थ्यांनी 'झाडे वाचवा, पर्यावरण वाचवा' हा प्रभावी संदेश समाजापर्यंत पोहोचविला.कला शिक्षक सलीम आतार व सविता कुंटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांच्या मनात निसर्गाविषयी प्रेम, जिव्हाळा आणि जबाबदारीची भावना निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरला.झाडे आहेत म्हणून आपण आहोत; त्यामुळे झाडांचे रक्षण करणे हीच खरी मानवतेची राखी!' असा संदेश देणारा हा आगळावेगळा वृक्ष रक्षाबंधन उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरला.या उपक्रमासाठी प्रशालेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब घोलप, शिक्षक कुलभूषण व्यवहारे, राजेंद्र शिंपी, नूतन पवार, दिलीप महाजन, शाम खोसरे, गणेश बल्लाळ, रवींद्र ठाकरे, स्वप्निल गांगुर्डे, किसनाबाई गोरे, किरण पाटील तसेच सर्व शिक्षकांनी सहकार्य केले.


## जिंतूर येथे ईदे मिलादुन्नबी निमित्त युथ मूव्हमेंट ऑफ महाराष्ट्रच्या वतीने रक्तदान शिबीर यशस्वी




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** येथील विलासराव देशमुख उर्दू शाळा येथे ईदे मिलादुन्नबी निमित्त दि. २६ ऑगस्ट २०२६, बुधवार रोजी सकाळी १० वाजता युथ मूव्हमेंट ऑफ महाराष्ट्र, जिंतूर युनिटच्या वतीने रक्तदान शिबिराचे यशस्वी रित्या आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटनची सुरुवात झैन सिद्दीकी यांच्या कुरआन पठण व अनुवादाने केली. यावेळी मुफ्ती कलीम बेग नदवी (अध्यक्ष, जमियत उलेमा-ए-हिंद, मराठवाडा) यांनी आपल्या भाषणातून सध्याच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर रक्तदानाचे महत्त्व व आवश्यकता यावर सविस्तर प्रकाश टाकला. त्यानंतर प्रमुख पाहुणे अनिल विभूते (उपविभागीय पोलीस अधिकारी) वासिफोद्दीन सिद्दीकी, मौलाना सिराजोद्दीन नदवी, डॉ. इरफान खान आगाई पाटील तसेच सद्भावना मंच, जिंतूरचे अध्यक्ष पंढरीनाथ शिंदे यांनी आपले सामाजिक एकता व कट्टरता यावर आपले मौल्यवान विचार व्यक्त केले.अध्यक्षीय भाषणात काजी आसिफोद्दीन यांनी रक्तदान शिबिराच्या आयोजनाची गरज व महत्त्व यावर प्रकाश टाकला. तसेच शिबिराच्या आयोजकांचे कौतुक करून त्यांचे मनोबल वाढविले.तसेच मा.अनिल विभुते यांच्या हस्ते युथ मुव्हमेंटच्या वतीने परभणी जिल्ह्यासाठी रक्त हेल्पलाइन ७८४१९३९१९१ या क्रमांकाचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी विलासराव देशमुख शाळेचे कौतुक करत शाळेचे नावावरूनच धार्मिक एकता व आखडता झळकत असल्याचे यावेळी सांगितले.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार सिराजोद्दीन सिद्दीकी, पत्रकार शकील अहेमद उर्फ बबलू भाई, डॉ. जुनेद खान, न्यूज रिपोर्टर रियाज चाऊस यांच्यासह शहरातील नागरिक रक्तदाते हे उपस्थित होते.या रक्तदान शिबिरात सुमारे ५० व्यक्तींनी रक्तदान केले, त्यामध्ये दोन महिलांचाही समावेश होता.शिबिर यशस्वी करण्यासाठी परभणी सामान्य रुग्णालयातील रक्तपेढी तज्ञ डॉक्टर, खटिंग, डॉ.खालेद देशमुख, डॉ.रोहिणी मुंडे, डॉ. विनोद राठोड डॉ.संजय वाघमारे, टेक्निशियन आंबटवार, बेंडसूरे ,लीपने यांच्यासह स्थानिक अझहरुद्दीन सिद्दीकी, सय्यद आमिर, शेख मोहसिन सर, सुफियान बावजीर, रझी सिद्दीकी, अब्दुल अहाद इंजि. शेख गौस, सय्यद अय्यूब अली, मिर्झा फरहत बेग, सय्यद वसीम बापू, जव्वाद खान, झैन सिद्दीकी आणि अरफात कादरी आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जमाती-ए - इस्लामी जिंतूरचे स्थानिक सचिव मिर्झा आसिमबेग यांनी केले तर आभार जमाते -ए - इस्लामी जिंतूरचे स्थानिक अध्यक्ष अहेमद सिद्दीकी यांनी मानले.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २९ ऑगस्ट २०२६


# प्राध्यापक ते प्राचार्य : डॉ. मझहर अहमद फारूकी यांचा प्रेरणादायी शैक्षणिक प्रवास



**मा**णसाची खरी महानता केवळ तो ज्या पदावर किंवा जबाबदारीवर कार्यरत असतो त्यावरून ठरत नाही, तर तो आपल्या पदाची जबाबदारी किती प्रतिष्ठेने, प्रामाणिकपणे, विद्वत्तेने, कर्तव्यभावनेने आणि निष्ठेने पार पाडतो यावरून ठरते. काही व्यक्ती त्यांच्या पदामुळे ओळखल्या जातात; मात्र काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, आपल्या क्षमता, चारित्र्य, परिश्रम आणि सेवाभावातून ती स्वतःच्या पदालाच प्रतिष्ठा प्राप्त करून देतात. डॉ. मझहर अहमद फारूकी हे अशाच प्रतिभावान, गंभीर आणि सन्माननीय शैक्षणिक व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. त्यांचा प्रवास संशोधन आणि अध्यापनापासून सुरू होऊन शैक्षणिक नेतृत्व आणि संस्थात्मक विकासापर्यंत पोहोचला आहे.डॉ. मझहर अहमद फारूकी यांचा शैक्षणिक प्रवास मूलतः रसायनशास्त्राच्या क्षेत्राशी संबंधित राहिला आहे. त्यांनी रसायनशास्त्र विषयात उच्च शिक्षण घेत एम.एस्सी. (M.Sc.) ही पदवी प्राप्त केली. त्यानंतर फिजिकल केमिस्ट्रीसारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रात संशोधन करून पीएच.डी. (Ph.D.) पूर्ण केली. संशोधनाच्या काळात त्यांची विशेष रुची रासायनिक संशोधनामध्ये राहिली. वैज्ञानिक संशोधन हा त्यांच्या व्यावसायिक जीवनाचा महत्त्वाचा भाग बनला. त्यांच्या संशोधन कार्यामध्ये पर्यावरणपूरक रासायनिक निर्देशक, औषधनिर्मितीशी संबंधित प्रायोगिक पद्धती आणि शाश्वत वैज्ञानिक नवकल्पना यांसारख्या विषयांना विशेष स्थान राहिले आहे.2004 नंतर त्यांच्या संशोधन कार्याला आणखी व्यापक स्वरूप प्राप्त झाले. विविध वैज्ञानिक व्यासपीठांशी जोडले जाऊन त्यांनी रसायनशास्त्राच्या क्षेत्रात संशोधन तसेच शाश्वत वैज्ञानिक नवकल्पनांसाठी कार्य केले. त्यांच्या विविध संशोधन प्रयत्नांदरम्यान आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक नियतकालिकांमध्ये अनेक संशोधनपर लेखही प्रकाशित झाले. हे त्यांच्या संशोधनविषयक जिज्ञासा, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि शैक्षणिक योगदानाचे द्योतक आहे.अध्यापनाच्या क्षेत्रातही डॉ. फारूकी यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या दृष्टीने शिक्षण म्हणजे केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणे नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, शैक्षणिक आणि व्यावहारिक विकासाची एक व्यापक प्रक्रिया आहे. शिक्षक म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची वृत्ती, चिंतनशील विचार, प्रश्न विचारण्याची क्षमता आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याचा आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. हाच अध्यापनाचा अनुभव पुढे त्यांच्या प्रशासकीय आणि शैक्षणिक नेतृत्वासाठी भक्कम आधार ठरला.त्यांच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा 2019 मध्ये आला, जेव्हा त्यांची मौलाना आझाद कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, औरंगाबाद येथे प्राचार्य म्हणून नियुक्ती झाली. ही जबाबदारी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील एका नव्या पर्वाची सुरुवात होती. शिक्षक म्हणून ते विद्यार्थ्यांना ज्ञान आणि मार्गदर्शन देत होते; तर प्राचार्य म्हणून संपूर्ण संस्थेच्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि संघटनात्मक कार्यांची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली.डॉ. फारूकी यांनी या नव्या जबाबदारीला व्यावसायिक नेतृत्वाचा एक आदर्श निर्माण करून दिला. त्यांच्या नेतृत्वाखाली शिक्षणाचा दर्जा उंचावणे, विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या संधी वाढवणे आणि संस्थेच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्यांची संकल्पना अशा शैक्षणिक संस्थेची आहे, जिथे केवळ शिक्षण दिले जात नाही, तर शिक्षक, विद्यार्थी आणि प्रशासन यांच्या परस्पर सहकार्याने ज्ञान, संस्कार आणि प्रशिक्षणाचे सकारात्मक वातावरण निर्माण होते.शैक्षणिक संस्थेचा विकास केवळ प्रशासकीय निर्णयांमुळे शक्य होत नाही. त्यासाठी स्पष्ट शैक्षणिक दृष्टी, सक्षम नियोजन, गुणवंत शिक्षक, मेहनती विद्यार्थी आणि जबाबदार प्रशासन आवश्यक असते. डॉ. फारूकी यांच्या कार्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी अध्यापनाचा अनुभव आणि प्रशासकीय दूरदृष्टी यांचा सुंदर समन्वय साधत संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले.त्यांच्या प्रशासकीय क्षमतेची आणि शैक्षणिक सेवांची दखल घेत त्यांची विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) एका समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. या जबाबदारीच्या माध्यमातून नवीन शैक्षणिक धोरण (NEP-2020) आणि त्याच्या अंमलबजावणीशी संबंधित विषयांमध्ये योगदान देण्याची संधी त्यांना मिळाली. ही जबाबदारी त्यांच्या शैक्षणिक सेवांना व्यापक स्तरावर मिळालेल्या मान्यतेचे प्रतीक आहे.डॉ. फारूकी यांच्या नेतृत्वाखाली संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या संधींचा विस्तार झाला.2024 मध्ये विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्याच्या दिशेनेही महत्त्वपूर्ण प्रयत्न करण्यात आले. डॉ. फारूकी यांच्या नेतृत्वाखाली विविध क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांसाठी चांगल्या संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांना शैक्षणिक जीवनानंतरच्या व्यावहारिक क्षेत्रासाठी तयार करणे यावर भर देण्यात आला. यातून त्यांची शिक्षणाकडे पाहण्याची व्यापक दृष्टी स्पष्ट होते. त्यांच्या मते शिक्षण हे जीवनाच्या गरजांशी जोडलेले असणे आवश्यक आहे.2026 मध्येही त्यांच्या मार्गदर्शनाखाली वैज्ञानिक संशोधन आणि शाश्वत वैज्ञानिक नवकल्पना या विषयांशी संबंधित विविध उपक्रमांना प्रोत्साहन देण्यात आले. विविध परिषदांमध्ये संशोधनपर लेख सादर करणे तसेच शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील पर्यावरणाशी संबंधित विषयांवर सहभाग आणि संशोधनाच्या जबाबदारीबाबत महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली. यावरून स्पष्ट होते की डॉ. फारूकी यांच्या दृष्टीने आधुनिक शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ परीक्षेत यश मिळवणे नसून संशोधन, नवकल्पना, पर्यावरणपूरक विचार आणि समाजासाठी उपयुक्त योगदान देणे हे देखील आहे.कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या यशाचे खरे मोजमाप म्हणजे विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, शिक्षकांची व्यावसायिक क्षमता आणि संस्थेमध्ये निर्माण झालेले सकारात्मक शैक्षणिक वातावरण. या दृष्टिकोनातून डॉ. मझहर अहमद फारूकी यांचे प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत. शिक्षणातील बदलत्या गरजा आणि आधुनिक शैक्षणिक आव्हाने ते जाणून घेतात. आजच्या काळात शैक्षणिक संस्थांना पारंपरिक पद्धतींसोबतच नैतिक व मानवी मूल्ये जपत आधुनिक गरजांशी सुसंगत राहण्याची आवश्यकता आहे. अशा परिस्थितीत त्यांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरू शकते.डॉ. फारूकी यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये अध्यापनाचा अनुभव, संशोधनाची दृष्टी, प्रशासकीय समज आणि नेतृत्वक्षमता यांचा सुंदर संगम दिसून येतो. त्यांच्या अनुभवामुळे त्यांना समस्या जवळून समजून घेण्याची संधी मिळाली. संशोधनामुळे त्यांच्या जिज्ञासू आणि विश्लेषणात्मक विचारशक्तीला बळ मिळाले, तर प्रशासकीय जबाबदाऱ्यांमुळे संपूर्ण संस्थेच्या व्यापक गरजा समजून घेण्याची आणि त्यावर कार्य करण्याची संधी मिळाली.एका शैक्षणिक नेत्यासाठी केवळ प्रशासकीय क्षमता पुरेशी नसते. मानवी स्वभाव समजून घेणे, विविध विचारसरणी आणि स्वभावाच्या व्यक्तींशी समन्वय साधणे तसेच संस्था आणि व्यक्तींच्या हिताचा समतोल राखणे आवश्यक असते. डॉ. फारूकी यांच्या दीर्घ शैक्षणिक आणि प्रशासकीय अनुभवामुळे त्यांच्यामध्ये ही दूरदृष्टी विकसित झाली आहे की संस्थेच्या प्रगतीसाठी परस्पर आदर, सहकार्य, शिस्त आणि सकारात्मक वातावरण अत्यंत आवश्यक आहे.आज शिक्षण क्षेत्रासमोर अनेक आव्हाने उभी आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची कमी होत चाललेली सवय, सोशल मीडियाचा वाढता प्रभाव, बदलत्या गरजा, स्पर्धात्मक वातावरण, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानाचा वेगाने होणारा विकास यामुळे शैक्षणिक संस्थांची जबाबदारी पूर्वीपेक्षा अधिक वाढली आहे. अशा परिस्थितीत एका शैक्षणिक नेत्याने केवळ प्रशासकीय बाबींवर लक्ष केंद्रित न करता विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची वृत्ती, सर्जनशील विचार, नैतिक जाणीव आणि व्यावहारिक कौशल्ये विकसित करण्यासाठीही प्रयत्न करणे आवश्यक आहे.डॉ. मझहर अहमद फारूकी यांचा प्रवास ही वस्तुस्थिती अधोरेखित करतो की यश हे एका दिवसाचे किंवा एका पदाचे फलित नसते. ते अनेक वर्षांच्या परिश्रम, संशोधन, अनुभव, अध्ययन, निरीक्षण आणि सातत्यपूर्ण शिकण्याच्या प्रक्रियेचे फलित असते. संशोधकापासून शिक्षक आणि त्यानंतर प्रभावी शैक्षणिक प्रशासक व नेता होण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास नवीन पिढीसाठी तसेच शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांसाठी अनुकरणीय आहे. एखादी व्यक्ती आपल्या कार्याशी प्रामाणिक राहिली, आपल्या क्षमतांचा सातत्याने विकास केला, जबाबदाऱ्या योग्य प्रकारे पार पाडल्या आणि सेवाभाव जपला, तर ती संस्था आणि समाजावर दीर्घकाळ टिकणारा सकारात्मक प्रभाव निर्माण करू शकते.त्यांच्या सेवांचा गौरव हा अशा शैक्षणिक समाजाच्या उज्ज्वल भवितव्याचा संकेत आहे, ज्यामध्ये एक शिक्षक उत्तम शिक्षक म्हणून ओळखला जातो; तर एक उत्तम शैक्षणिक नेता संपूर्ण संस्थेची दिशा निश्चित करून शेकडो आणि हजारो विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर प्रभाव टाकू शकतो. डॉ. फारूकी यांनी या दोन्ही जबाबदाऱ्यांचा अनुभव घेतला आहे. त्यामुळे त्यांचा शैक्षणिक प्रवास अधिक उल्लेखनीय ठरतो.त्यांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय जीवन हा संदेश देते की शिक्षण हे केवळ नोकरी किंवा व्यवसाय नसून राष्ट्र आणि समाजाच्या निर्मितीचे एक प्रभावी माध्यम आहे. प्रशासन आणि नेतृत्वाच्या विविध टप्प्यांतून प्रवास करताना डॉ. मझहर अहमद फारूकी यांनी आपल्या परीने ज्ञान आणि सेवेचा दीप प्रज्वलित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.निःसंशयपणे, एखाद्या व्यक्तीच्या कार्याचे अंतिम मूल्यमापन काळच करतो. परंतु जे लोक आपल्या पदाचा उपयोग वैयक्तिक स्वार्थासाठी न करता शैक्षणिक, सामाजिक आणि संस्थात्मक सेवेसाठी करतात, त्यांच्या प्रयत्नांना सदैव आदर मिळत राहतो. डॉ. मझहर अहमद फारूकी यांचा अध्यापनापासून शैक्षणिक नेतृत्वापर्यंतचा प्रवास कर्तव्यभावना, सातत्यपूर्ण परिश्रम, संशोधन, शैक्षणिक सेवा आणि सेवाभावाचे एक प्रशंसनीय उदाहरण आहे.ईश्वराकडे प्रार्थना आहे की, डॉ. मझहर अहमद फारूकी यांना उत्तम आरोग्य, सुख-समाधान, अधिक शैक्षणिक आणि प्रशासकीय दूरदृष्टी लाभो. शिक्षणाच्या क्षेत्रात सेवा करण्यासाठी त्यांना निरंतर ऊर्जा मिळो, त्यांच्या शैक्षणिक आणि संशोधनविषयक प्रयत्नांना यश लाभो आणि त्यांच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात आणखी उपयुक्त व उल्लेखनीय कार्य करण्याची संधी मिळो. आमीन.


**लेखक: डॉ. मौलाना मोहम्मद अब्दुस्समी नदवी**

सहाय्यक प्राध्यापक, अरबी विभाग,

मौलाना आझाद कॉलेज, औरंगाबाद

मोबाईल: 9325217306